**किरकोळ फौ.क्र. २०९/२०१९**
**तसिना—वि—अंशल**
**नि.क्र. ५७ व ८६ पुढे**

**<u>अर्जदारतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा सरतपास अर्जदार यांचे वकिल श्री.एच.पी. अदवंत यांचेमार्फत शपथेवर सुरू...</u>**

**०१.** माझे पुराव्याचे शपथपत्र मी **निशाणी क्र.८६** खाली दिले आहे. त्यातील मजकुर माझे सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर आहे व त्यावर माझी सही आहे. पुराव्याचे शपथपत्र **निशाणी क्र.८६** वर आहे.

**०२.** माझा मुलगा नामे फॉस्टीन अंशल याला ऑर्टिझम व एडीएचडी याचे आजार झाले आहे त्याबद्ल अम्रिता इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्स यांनी दिलेले रिपोर्ट मी प्रकरणात दाखल केले आहे. आता मला सदरचे रिपोर्टची मुळ प्रत दाखविण्यात आलेली आहे. ती तीच असुन **नि.क्र.९२** देण्यात येते.

**०३.** माझे मुलाचे उपचाराकरीत मी अम्रिता इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्स मध्ये लागणारे सर्व खर्च स्वत: भरले आहे. सदरचे बिलाचे मुळ प्रत मी प्रकरणात दाखल केले आहे. आता मला ते दाखविण्यात आले ते तेच असुन त्यांना एकांत्रीतपणे **नि.क्र.९३** देण्यात येत आहे.

**०४.** माझे मुलाचे शाळेमध्ये वागणूक नियमीत मुलांसारखी नसल्यामुळे सेंट उर्सुला हायस्कुलचे मुख्याध्यापकने त्याची तपासणी करून प्रमाणपत्र आणण्याबद्दल पत्र दिले होते. सदरचे पत्र मी प्रकरणात दाखल केले आहे. आता मला ते पत्र दाखविण्यात आले ते तेच असुन त्याला **नि.क्र.९४** देण्यात आले. सदर पत्र भेटल्यानंतर मी डॉ.वैदेही यांना माझया मुलाची तपासणी करण्याकरीता मी घेवून गेले होते त्यांनतर त्यांनी प्रिंसिपलच्या नावाने पत्र दिले होते. सदरचे पत्र मी प्रकरणात दाखल केले आहे. आता मला ते दाखविण्यात आले आहे. त्यास **नि.क्र.९५** देण्यात आले.

**०५.** माझे मुलाचे बोलणे व ऐकण्याबद्दलचे उपचार मी लिसन ॲड स्पीच यांच्याकडे केले होते त्याबद्दलचे पत्र मी प्रकरणात दाखल केले आहे. आता मला ते दाखविण्यात आले आहे. त्यास **नि.क्र.९६** देण्यात आले.

**०६.** त्यानंतर मी माझया मुलाच्या उपचाराकरीता युनिक चिल्ड्रन हॉस्पीटलमध्ये गेले तेथे माझया मुलावर पुढील उपचार करण्यात आले व त्याचे

उपचाराकरीता प्रतीमहा तेरा ते पंधरा हजार रूपये लागतील त्याबद्दलचे पत्र मी प्रकरणात दाखल केले आहे. आता मला ते दाखविण्यात आले आहे. त्यास **नि.क्र. ९७** देण्यात आले.

**०७.** तसेच मी माझया मुलाचे उपचार होमिओ क्लीनिक येथे करत आहे व त्याकरीता मला पाच ते सहा हजार रूपये प्रतीमहा खर्च लागेल. याबद्दलचे पत्र मी दाखल केले आहे. आता मला ते दाखविण्यात आले आहे. त्यास **नि.क्र.९८** देण्यात आले.

**०८.** मी माझया मुलाला एसएमएन इंग्लिश स्कुलमध्ये शिक्षणाकरीता टाकले होते व तेथील सर्व खर्च मी स्वत: केले आहे. त्या बद्दलचे सर्व पावती मी प्रकरणात दाखल केले आहे. आता मला ते दाखविण्यात आले आहे. त्यास एकांत्रीतपणे **नि.क्र.९९** देण्यात आले.

**०९.** मी माझे मुलाचे पुढील शिक्षणाकरीता मी त्याला सेंट ऍन्स स्कुल, निगडी येथे टाकले होते व तेथील टयुशन फीस व इतर लागणारे खर्च मी स्वत: केले आहे हे दर्शविणारी पावती मी स्वत: दाखल केली आहे. आता मला ते दाखविण्यात आले आहे. त्यास एकांत्रीतपणे **नि.क्र.१००** देण्यात आले.

**१०.** गैरअर्जदार हा टिसीएस मध्ये काम करत आहे. हे दर्शविणारे रिलोकेशन एक्सपेंसेस चा पत्र मी प्रकरणात दाखल केले आहे. आता मला ते दाखविण्यात आले आहे. त्यास **नि.क्र.१०१** देण्यात आले.

**अर्जदार यांचे विधिज्ञांच्या तोंडी विनंतीवरून सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब ...**

—समक्ष—

AL AMOODI ABDUL KHAYYUM
Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM
Date: 2024.12.19 11:19:17 +0530

**( अल अमुदी ए.के. )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**पिंपरी, पुणे.**
**दि.१८.१२.२०२४**

AL AMOODI ABDUL KHAYYUM
Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM
Date: 2024.12.19 11:19:21 +0530

**( अल अमुदी ए.के. )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**पिंपरी, पुणे.**